“महाराष्ट्र राज्यातील अकृषी विद्यापीठांत सादर केलेल्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील पीएच्.डी. प्रबंधातील उल्लेखांचे विश्लेषण : एक अभ्यास”

“Maharashtra Rajyatil Akrushi Vidyapeethat Sadar Kelelya Granthalaya Aani Mahitishastra Vishayatil Ph.D. Prabandhatil Ullekhanche Vishleshan : Ek Abhyas”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयांत आंतरविद्याशाखे अंतर्गत
पीएच्.डी. पदवीसाठी सादर करावयाचा
संशोधन आराखडा

-: संशोधक :-

राठोड जालिंदर बळीराम

-: मार्गदर्शक :-

डॉ. घटकार दगडू तुकाराम
सहाय्यक प्राध्यापक,
संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, जळकोट
ता. जळकोट, जि. लातूर

-: संशोधन केंद्र :-

स्कूल ऑफ मेडीया स्टडीज,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सप्टेंबर 2023

“महाराष्ट्र राज्यातील अकृषी विद्यापीठांत सादर केलेल्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील पीएच्.डी. प्रबंधातील उल्लेखांचे विश्लेषण : एक अभ्यास”

1. प्रस्तावना :

आजचे युग हे माहितीचे युग म्हणून संबोधले जाते. अशा युगाबाबत नवनवीन घडामोडी सतत घडत असतात व त्यातूनच नवनवीन माहितीचा परीस्फोट होतो. ग्रंथालयात येणा-या व न येणा-या साहित्यावर विविध प्रकारे प्रक्रीया करून ज्ञानाच्या विकासाचे वेध घेण्याचा प्रयत्न ग्रंथपालही करीत असतात. प्रामुख्याने ग्रंथालय व्यवस्थापनासाठी घेतला जातो. त्यात उल्लेख निर्देश हे एक असे महत्त्वाचे तंत्र आहे.

ग्रंथालय आणि माहितीशास्त्रांत दररोज नवनवीन माहितीचा उगम होत आहे. त्यात विवेचनात्मक अभ्यासपूर्ण रचनात्मक माहिती प्रस्तुत करताना उल्लेख देणे ही संशोधकांची एक सहज प्रवृत्ती आहे. संशोधनपर लिखाणात उल्लेखाचे फार महत्त्व आहे. काही विषयावरील संशोधनपर लिखाण जे विशिष्ट नियतकालिकांत प्रकाशीत होते त्यांनाच उल्लेख दिलेली असतात. उल्लेख हे निर्देशन तंत्राचा अवलंब करून तयार करतात. निर्देशातून निर्देशात नोंदविलेल्या एका प्रलेखाचा दुस-या प्रलेखांशी काही संबंध आहे.

उल्लेख म्हणजे लेखांच्या शेवटी दिली जाणारी वाचनसाहित्याची यादी लेखकाला आपले मत, आपले विचार मांडत असताना पूर्वी लिहिल्या गेलेल्या कोणत्या वाचनसाहित्याचा उपयोग झाला याची यादी विशिष्ट पद्धतीने दिली जाते त्यास उल्लेख असे म्हणतात.

संशोधनात उल्लेखांची गरज ही विवेचनाला पुष्टी मिळविण्यासाठी मुद्यांचे खंडन करण्यासाठी, मुद्दे खोडून काढण्यासाठी, विधान शंकास्पद असल्यास, मते

वेगवेगळी वाटल्यास, चुकीची माहिती दिली असल्यास उल्लेख हे अतिशय महत्त्वाचे ठरतात.

2. संशोधन विषयाचे महत्त्व :

संशोधन हा शब्द इंग्रजीतील Research या शब्दासाठी प्रतिशब्द असल्याचे आपणास दिसून येते. थोडक्यात याचा अर्थ Re म्हणजे पुन्हा आणि Search म्हणजे शोध घेणे होय. एखाद्या प्रश्नाचा किंवा समस्येचा पुन्हा नव्याने शोध घेऊन त्यातील नवीन माहिती मांडण्याचा प्रयत्न करणे होय. क्रापकोर यांच्या मते, “संशोधन म्हणजे कोणत्या तरी प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी क्रमबद्ध व शास्त्रशुद्ध चिंतन केलेले प्रयोग होय. समाजाचा, देशाचा विकास करण्यासाठी संशोधनामध्ये गुणवत्ता खूप महत्त्वाची आहे. समाजाचा तसेच देशाचा विकास होण्यासाठी संशोधन खूप मोलाची भूमिका पार पाडू शकते. ज्ञान आणि माहिती साधनांच्या निर्मितीत वेगाने वाढ होत असल्याचे दिसून येते. संशोधनाच्या बाबतीत गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी व गुणवत्तेत वाढ करण्यासाठी ग्रंथालय आणि माहितीशास्त्रांतील शोधप्रबंधाचा अभ्यास करणे गरजेचे बनले आहे. सध्याच्या परिस्थितीत आपल्या देशातील सर्वच विद्यापीठात संशोधन कार्य चालू असलेले आपणास दिसून येते. संशोधन कार्य करीत असताना संशोधक विविध संदर्भग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रातील व इंटरनेटवरील माहिती, शोधप्रबंध, इंटरनेटवरील ग्रंथ आणि मासिके या मुद्रीत आणि अमुद्रीत वाचन साहित्याचा वापर करीत असतो.

ज्ञानाचे संप्रेषण संदर्भ विरहीत होत नाहीत म्हणून प्रत्येक लेखक आपल्या लेखनात आवश्यक तेथे आशयाशी संबंधीत असा संदर्भ तयार करीत असतो. प्रबंध आणि शोधनिबंध यामध्ये संशोधकाने किंवा लेखकाने व्यक्त केलेल्या विचारांना आणि मतांना आधी निश्चीत झालेल्या सिद्धांताचा आणि सुत्राचा संबंध असतो. संशोधनात उपयोजिलेल्या पद्धती आणि तंत्रे यांच्या समर्थनार्थ आणि प्रयोगांमध्ये अवलंबलेली सुत्रे

आणि वापरलेली यंत्रे आणि उपकरणे यांच्या पुष्ट्यर्थ प्रत्येक लेखक त्यांच्या आधीच्या लेखकांचा आधार घेत असतो. त्याचप्रमाणे आधीच्या लेखकांची मते खोडून काढण्यासाठीच तो त्यांचा उल्लेख लेखनात करीत असतो. लेखनांतील अशा सर्व उल्लेखांची लेखांच्या शेवटी संदर्भसूची दिलेली असते हे जे सर्व उल्लेख असतात त्यांना इंग्रजीमध्ये Citation म्हणतात. ज्या लेखकांचा आणि लेखाचा उल्लेख होता त्यांना अनुक्रमे Cited Author & Cited document असे म्हणतात. याच्या उलट जे लेखक अशा आधी प्रकाशीत झालेल्या लेखांचा उल्लेख करतो त्यांना Cited Author म्हणतात. ज्या लेखात उल्लेख केलेला असतो त्यांना Citing Document म्हणतात. उल्लेख करणारा लेखक आणि उल्लेखित लेखक किंवा ज्या प्रलेखात उल्लेख करण्यात आला तो प्रलेख आणि उल्लेखीत प्रलेख त्यांच्यातील संबंधाचा अभ्यास म्हणजे सायटेशन ॲनालिसीस होय.

लेखक एखादा लेख लिहीत असताना आपल्या लेखात दुस-याच्या लिखीत साधनांचा त्यांनी उपयोगात आणलेल्या संदर्भ घेतलेल्या इतर माहितीचा उल्लेख करत असतो. यालाच Citing किंवा Referencing म्हणतात. ज्या प्रलेखाचा आपण संदर्भ म्हणून उल्लेख करतो त्यास उल्लेखीत प्रलेख असे म्हणतात. तसेच ज्या प्रलेखात उल्लेख केला जातो त्याला उल्लेखणार प्रलेख असे म्हणतात. तांत्रिक लेखनाकरिता देण्याची ही एक जुनी परंपरा आहे. व्हाईट (1985) मिल्नीस आणि सिनेटा (1989) यांनी citation चा विकास दर्शविला आहे.

3. संशोधन विषयाची निवड :

उल्लेख करणारा प्रलेख आणि उल्लेखीत प्रलेख यांची पद्धतशीर यादी म्हणजे उल्लेख निर्देशन होय. उल्लेख म्हणजे काय, उल्लेखाची कारणे, उल्लेखाची उत्पत्ती, उल्लेख निर्देशनाचे फायदे, उल्लेख विश्लेषण कसे करावे या संदर्भाचे विश्लेषण एका तंत्रानुसार केले जाते. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयातील शोधप्रबंधाचे

भुतकाळ आणि वर्तमानकाळानुसार बदलते स्वरूप जाणून घेण्यासाठी तसेच संशोधन विषय निश्चित झाल्यानंतरच संशोधन कार्याला प्रत्यक्ष सुरूवात होत असते. संशोधन विषयाची वास्तविकता सद्यस्थिती अभ्यासणे गरजेचे असते. माहितीची उपलब्धता मोठ्या प्रमाणात असल्याने विविध विषयांची मासिके, संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रे, पीएच्.डी. प्रबंध, पेटंट प्रमाणके व गॅझेट इत्यादींचा वापर हा माहितीचा शोध घेण्यासाठी केला जातो. सद्यस्थितीतील हीच गरज लक्षात घेऊन "महाराष्ट्र राज्यातील अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयांतील पीएच्.डी. प्रबंधातील उल्लेखांचे विश्लेषण : एक अभ्यास" या विषयाची निवड संशोधनाकरिता करण्यात आली आहे.

संशोधनाचे शिर्षक :-

"महाराष्ट्र राज्यातील अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयांतील पीएच्.डी. प्रबंधातील उल्लेखांचे विश्लेषण : एक अभ्यास."

4. संशोधन विषयाची गरज :-

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयांमध्ये संशोधन करण्याच्या तसेच सामाजीक शास्त्रातील अन्य विषयांत संशोधन करणा-या संशोधकांना सदर संशोधन शोधप्रबंधाआधारे उल्लेखांचे विश्लेषण कसे करण्यात येते या संदर्भात उपयुक्त माहिती मिळणार आहे. त्याप्रमाणे संशोधनाच्या दृष्टीकोनातून उल्लेखांचे महत्त्व देखील लक्षात येवू शकेल. शोधप्रबंधाच्या माध्यमातून ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयांत कोणकोणत्या शिर्षकाअंतर्गत संशोधन चालू आहे अशी समस्या निर्माण झाली तसेच यापूर्वी या विषयांवरील संशोधनाविषयी अभ्यास न झाल्यामुळे संशोधकाने या विषयाची निवड केली आहे. ग्रंथालय आणि माहितीशास्त्रामध्ये विशेषतः सांख्यिकीय अभ्यासासाठी ग्रंथमित्तीय संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येतो. संशोधक करत असलेल्या संशोधनातील विचारप्रवाह समजण्यास मदत होते. जास्तीत जास्त कोणते

संदर्भ ग्रंथ, ग्रंथ, नियतकालिके वापरतात याची शास्त्रशुद्ध माहिती समजण्यास मदत होते. संदर्भाचे एकत्रीकरण होऊ शकते. त्याचप्रमाणे त्या-त्या विषयांतील वाचकांच्या सवयींच्या पद्धती समजू शकतात. त्यामुळे संशोधकाने सदरील विषय अध्ययनासाठी निवडला आहे.

5. महत्त्वपूर्ण संज्ञा :

उल्लेख विश्लेषण :

संशोधन लिखाणात उल्लेखाला अतिशय महत्त्व आहे. इंग्रजीमध्ये याला Reference किंवा Citation Analysis असे संबोधले जाते. लेखकाने पूर्वी प्रकाशीत झालेल्या वाचनसाहित्याचा अभ्यास करून त्या संबंधित साहित्यकाचे ऋण व्यक्त करणे होय. थोडक्यात लेखाच्या शेवटी दिली जाणारी वाचनसाहित्याची यादी आपले विचार लेख स्वरूपात मांडत असताना लेखकांना इतर पूर्वी लिहिले गेलेल्या कोणत्या वाचनसाहित्याचा उपयोग झाला याची यादी विशिष्ट पद्धतीने दिली जाते त्याला उल्लेख असे म्हणतात.

शोधगंगा :

शोधगंगा भारताचे शोधप्रबंधाचे ऑनलाईन इलेक्ट्रॉनिक भांडार आहे. याची इनफ्लीबनेट केंद्राद्वारे स्थापना केली आहे. संशोधकांना त्यांचे प्रबंध जमा करण्यासाठी आणि संपूर्ण संशोधक समुदायाला मुक्त प्रवेश उपलब्ध करून देण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करते.

6. संशोधनाची उद्दिष्टे :

प्रस्तुत संशोधन कार्य करीत असताना संशोधकाने खालीलप्रमाणे उद्दिष्टे निश्चित केली आहेत-

1) महाराष्ट्र राज्यातील अकृषी विद्यापीठांत सादर केलेल्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील पीएच्.डी. प्रबंधाच्या संदर्भसूचीतील उल्लेखांचा शोध घेणे.

2) महाराष्ट्र राज्यातील अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयातील पीएच्.डी. प्रबंधाच्या संदर्भसूचीतील उल्लेखांचे वाचनसाहित्य व माहितीसाधनांच्या प्रकारानुसार वर्गीकरण करणे.
3) महाराष्ट्र राज्यातील अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयातील पीएच्.डी. प्रबंधातील संदर्भसूची उल्लेखांचे भौगोलिक, कालखंड व वर्षनिहाय स्थळ यांचा परामर्श घेणे.
4) महाराष्ट्र राज्यातील अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयातील पीएच्.डी. प्रबंधामध्ये वापरण्यात आलेल्या संदर्भसूचीतील उल्लेखांची भाषानिहाय व लेखकनिहाय माहिती घेणे.
5) महाराष्ट्र राज्यातील अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयातील पीएच्.डी. प्रबंधाच्या संदर्भांचे उल्लेखीत साहित्याची रँकलिस्ट तयार करणे.

7. संशोधनाची गृहीतके :

संशोधनात गृहीतके ही संशोधनाचा केंद्रबिंदू मानला जातो. संशोधन पूर्ण होण्याआधीच जी संभाव्य उत्तरे धरली जातात. त्यास गृहीतके संबोधले जाते. प्रस्तूत संशोधनासाठी खालीलप्रमाणे गृहितके निश्चीत केली आहेत.

1) महाराष्ट्र राज्यातील अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयातील पीएच्.डी. प्रबंधात मोठ्या प्रमाणात संदर्भ उल्लेख देण्यात आलेले आहेत.
2) महाराष्ट्र राज्यातील अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयातील पीएच्.डी. प्रबंधातील उल्लेखांचे वाचनसाहित्य तसेच माहिती साधनाच्या प्रकारानुसार वर्गीकरण करता येते.

3) महाराष्ट्र राज्यातील अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयातील पीएच्.डी. प्रबंधातील उल्लेखांचा भौगोलिक स्थानानुसार व कालखंडानुसार उपयोग करण्यात आला आहे.

4) महाराष्ट्र राज्यातील अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयांतील पीएच्.डी. प्रबंधातील उल्लेख विविध भाषेतील व एक, दोन, तीन व तीनपेक्षा अधिक लेखक योगदान प्रकारातील आहेत.

5) महाराष्ट्र राज्यातील अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयांतील पीएच्.डी. प्रबंधातील उल्लेखीत साहित्याची रॅंकलिस्ट तयार करता येते.

8. संशोधन पद्धती :

'संशोधन' हा शब्द इंग्रजी भाषेतील 'Research' या इंग्रजी शब्दासाठी मराठी शब्द आहे. Research चा भाषिक अर्थ असे व्यक्त करतो की, एखाद्या हरविलेल्या वस्तूचा शोध घेतला परंतु ती मिळाली नाही म्हणून तिचा पुन्हा शोध घेण्याची प्रक्रिया आहे.

एल.व्ही. रोडमन यांच्या मते नवीन ज्ञान प्राप्तीच्या व्यवस्थीत प्रयत्नाला आपण संशोधन असे म्हणतो.

वर्णनात्मक संशोधन पद्धती :

वर्णनात्मक संशोधन पद्धत हे एक स्थूल वर्गीकरण आहे. यामध्ये विशिष्ट तंत्रे पद्धतीचा प्रक्रीयांचा समावेश होतो. अभ्यासवस्तूचा स्तर, दर्जा स्पष्ट करणे हा सर्वांचा समान हेतू असतो. वर्णनात्मक संशोधन पद्धतीमध्ये सर्वसाधारणपणे परीकल्पना मांडणे व ती तपासणे ही प्रक्रीया होते. हे संशोधन कार्य करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

9. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही महाराष्ट्र राज्यातील अकृषी विद्यापीठांमधील शोधगंगा या संकेतस्थळांवर उपलब्ध असलेल्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयांत पीएच्.डी. साठी सुरूवातीपासून ते एप्रिल 2023 पर्यंत उपलब्ध झालेल्या 371 प्रबंधापुरती मर्यादीत आहे.

10. माहिती संकलन साधने व तंत्रे :

महाराष्ट्र राज्यातील अकृषी विद्यापीठांत सादर केलेल्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र पीएच्.डी. प्रबंधाचे संदर्भसूचीच्या सहाय्याने माहितीचे संकलन करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्यातील अकृषी विद्यापीठांत ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयात शोधगंगा या संकेतस्थळावरील उपलब्ध असलेल्या पीएच्.डी. प्रबंधाचे संदर्भ सूचीच्या सहाय्याने माहितीचे संकलन करण्यात येणार आहे.

11. माहिती विश्लेषण :

महाराष्ट्र राज्यातील अकृषी विद्यापीठांत सादर केलेल्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयांत पीएच्.डी. प्रबंधाचे संदर्भ सूचीच्या सहाय्याने माहितीचे संकलन केल्यानंतर शास्त्रीय पद्धतीचा आधार घेऊन माहिती विश्लेषण करण्यात येणार आहे.

12. प्रकरणाची रचना :

प्रकरण पहिले - प्रस्तावना

या प्रकरणात मुलभूत माहिती व संशोधनासाठी वापरावयाची संशोधन पद्धती याबाबतचे विवेचन करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे - पूर्व साहित्याचा आढावा

या प्रकरणात प्रस्तावित संशोधन विषयासंबंधीत ग्रंथ, नियतकालिके तसेच डिजीटल माध्यमांतील वाचनसाहित्याचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे - माहिती संकलन

या प्रकरणांत संबंधित माहितीचे संकलन व मांडणी करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे - माहितीचे विश्लेषण

या प्रकरणात संशोधनातून आलेल्या माहितीचे विश्लेषण सादर करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे - निष्कर्ष व शिफारशी

या प्रकरणात संशोधनातून आलेले निष्कर्ष व शिफारशी मांडण्यात येणार आहेत.

13. संदर्भ :-

1) आगलावे, प्रदीप 2000, सामाजीक पद्धती शास्त्र व तंत्रे, नागपूर : विद्या प्रकाशन, पृ. 214.
2) क-हाडे, बी. एम. 2007, शास्त्रीय संशोधन पद्धती नागपूर : पिंपळापूरे अॅण्ड कं. पब्लिशर्स.
3) कुमठेकर, आम्रपाली 2009, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर या अभ्यास केंद्रातील एम.लीब. शिक्षणक्रमाच्या संशोधन प्रकल्पातील उल्लेखांचे विश्लेषण.
4) भांडारकर, पु. ल. 1976, सामाजिक संशोधन पद्धती, औरंगाबाद : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ
5) https://shodhganga.inflibnet.ac.in>moredetails>about
6) पाटील, वा. भा. 1998, संशोधन पद्धती, पूणे : श्री मंगेश प्रकाशन, पृ. 128.

7) कायंदे पाटील, ग. वि. 2009, संशोधन पद्धती, नाशिक : चैतन्य पब्लिकेशन.

8) निकोसे, एस. 2007, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पद्धती, नागपूर : प्रज्ञा प्रकाशन.

9) कुंभार, राजेंद्र 2015, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पद्धती, पूणे : युनिव्हर्सल प्रकाशन.

संशोधक

राठोड जालिंदर बळीराम

मार्गदर्शक

डॉ. घटकार दगडू तुकाराम

सहाय्यक प्राध्यापक

संभाजीराव केंद्रे महाविद्‍यालय, जळकोट

ता. जळकोट, जि. लातूर.